परिपत्रक क्र. १०१

प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर दि. ०१/०८/२०१८

प्रति,
**मुख्याध्यापक,**
सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा,
शहर कोल्हापूर

**विषय :- धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ अंमलबजावणीबाबत ...**

संदर्भ :- १.मा. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचेकडील पत्र जा.क्र. अप्रौशि/प्रिमॅ/२०१८-१९/का-४/६७० दि.२५/७/२०१८
२.मा. प्र. शिक्षणाधिकारी(निरंतर शिक्षण), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र. शिअनिशि/प्री-मॅट्रीक शिष्य./२०१८/३८१-८४ दि. ३०.०७.२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविणेत येते की, धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या १५ कलमी कार्यक्रमानुसार धार्मिक अल्पसंख्यांक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. ही योजना दि. २३ जुलै, २००८ च्या शासन निर्णयानुसार सन २००८-०९ पासून राज्यात राबविण्यात येते. ही शिष्यवृत्ती योजना **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, पारशी, बौध्द व जैन या धार्मिक अल्पसंख्यांक इ. १ ली ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी** आहे.

संदर्भीय पत्रानुसार केंद्र शासनाने प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी नवीन व नूतनीकरण विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरावयाची प्रक्रिया NSP २.० या पोर्टलवर दि.२३/०७/२०१८ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

- **ज्या शाळांनी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी NSP २.० या पोर्टलवर अद्यापही नोंदणी (Registration) केलेली नाही, अशा शाळांनी दि. १५/०८/२०१८ पर्यंत नोंदणी** करावयाची आहे.
- **नवीन व नूतनीकरण विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३०/०९/२०१८ पर्यंत आहे.**
- सन २०१८-१९ या वर्षासाठी सर्व इच्छूक तसेच मागील वर्षीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांनी केंद्र **शासनाच्या www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन आपले अर्ज केवळ ऑनलाईन भरावयाचे आहे.**
- सन २०१७-१८ या वर्षी ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी आपले अर्ज **Renewal Student** म्हणून भरावयाचे आहेत. तसेच नवीन, इच्छूक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज **Fresh Student** म्हणून भरावयाचे आहेत.

शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असणाऱ्या सर्व इच्छूक विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची जबाबदारी संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांची असून शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना शाळा स्तरावरुन विद्यार्थी, पालक आणि इतर संबंधितांना आपण आवश्यक ते सहकार्य करणेचे आहे, याची नोंद घेणेत यावी.

**प्रशासनाधिकारी,**
प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,कोल्हापूर

काही शंका असल्यास शाळेच्या कार्यालयाशी व्यक्तीगत संपर्क साधावा.

Contact the school before 22nd Aug. 2018